# बालशिक्षणाचे नवे आंदोलन

महाराष्ट्र बालशिक्षण परिषद, ही बालशिक्षणाबाबतची एक चळवळ आहे. बालशिक्षण म्हणजे शालेयपूर्व किंवा प्राथमिकपूर्व शिक्षण. साधारणपणे सहा वर्षांपर्यंतचे घरी किंवा बालशाळांतून होणारे, लहान मुलांचे शिक्षण म्हणजे बालशिक्षण होय. हे शिक्षण शास्त्रीय पद्धतीने व्हावे, दर्जेदार व्हावे असा या परिषदेचा आग्रह आहे. असे शास्त्रीय नि दर्जेदार शिक्षण, महाराष्ट्रातील सर्वच मुलांना मिळावे, असाही परिषदेचा आग्रह आहे. त्यामुळे 'शास्त्रीय बालशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण असे महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने आपले ध्येयविधान ठेवलेले आहे.

महाराष्ट्राला शास्त्रीय बालशिक्षणाच्या प्रयत्नांची मोठी परंपरा आहे. ताराबाई मोडक (१८९२-१९७३) या महाराष्ट्रातील बालशिक्षणाच्या आद्य प्रणेत्या आहेत. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशातच, बालशिक्षण रुजविण्याचा मान, गिजुभाई बधेका (१८८५-१९३९) या त्यांच्या गुरू समवेत, ताराबाई मोडक यांना दिला जातो. गिजुभाई व ताराबाई यांनी, एकत्र येऊन, १९२६ साली 'नूतन बालशिक्षण संघा'ची स्थापना, गुजरातेत भावनगर येथे केली. त्याचवेळी, 'शिक्षणपत्रिका' नावाने बालशिक्षणविषयक मासिक गुजराती भाषेत सुरू करण्यात आले. या विचारपूर्वक घडविलेल्या घटनांतूनच शास्त्रीय बालशिक्षणाच्या प्रसाराचे पहिले आंदोलन, भारतात उभे राहिले. शास्त्रोक्त बालशिक्षणाचे प्रयोग, बालशाळा शिक्षकांचे प्रशिक्षण, बालशाळांचा प्रसार, बालशिक्षणविषयक शास्त्रीय विचारांचा प्रचार ही या बालशिक्षणाच्या पहिल्या आंदोलनाची चतुःसूत्री होती. या आंदोलनात १९२३ ते १९७३ असे बरोब्बर अर्धशतक ताराबाई आघाडीवर होत्या.

ताराबाई मोडक १९३२ साली गुजरातेतून महाराष्ट्रात परतल्या, आणि लगोलग, १९३३ साली त्यांनी 'शिक्षणपत्रिका' हे मासिक मराठीमध्ये आणि १९३४ ला हिंदीमध्येही सुरू केले. १९३३ साली सुरू झालेले हे 'शिक्षणपत्रिका' गेली पंचाहत्तर वर्षे अखंडपणे चालू आहे. ताराबाईंच्या आंदोलनाची महाराष्ट्रातील सुरुवात १९३६ साली मुंबईत 'शिशुविहार' सुरू करून झाली. येथे शहरीबालशिक्षणाचा नमुना उभा राहिला. तर १९४५ साली ठाणे जिल्ह्यात हरिजनांसाठी बालवाडी स्थापन करून, ताराबाईंनी, ग्रामीण बालशिक्षणाचा नमुना निर्माण केला. ताराबाई एवढ्यावरच थांबल्या नाहीत. १९५२ साली त्यांनी आपला मुक्काम कोसबाड या आदिवासी पाड्यावर हलविला. तेथे गिरिजनांमध्ये काम करताना, अंगणवाडी, बालवाडी, कुरणशाळा,

रात्रशाळा, विकासवाडी असे, बालशिक्षणाच्या प्रयोगांतून, बालशाळांचे शास्त्रीय नमुनेही निर्माण झाले. या प्रयोगशील कार्यांत, सरलाताई देवधर, शेषराव नामले, अनुताई वाघ असे पट्टीचे शिष्यगण ताराबाईंना लाभले.

ताराबाईंचे १९७३ साली निधन झाले, आणि त्यांनीच सुरू केलेल्या बालशिक्षणाच्या पहिल्या आंदोलनाचे काम, राष्ट्रभर बालशाळांचा प्रसार होऊन, ठप्प झाले. मध्यंतरी वीस वर्षांचा कालावधी गेल्यानंतर, ताराबाईंनी उभारलेल्या भव्य शास्त्रीयतेच्या पार्श्वभूमीवरच बालशिक्षणाचे दुसरे आंदोलन उभारण्याचा विचार संबंधित मंडळींनी केला. आणि १५ नोव्हेंबर १९९४ ला 'महाराष्ट्र बालशिक्षण परिषदे'ची मुहूर्तमेढ रोवण्यात आली.

बालशाळांना शास्त्रीय स्वरूप देणे, महाराष्ट्रातील सर्व बालकांपर्यंत हे शिक्षण पोचविणे, त्यासाठी समाजाचे, त्यातही विशेषतः पालकांचे प्रबोधन करणे, शासनाकडे बालशिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा आग्रह धरणे, शिक्षिकांचे नव्या शास्त्रोक्त बालशिक्षणासाठी आवश्यक असे प्रशिक्षण करणे, अशा त-हेची कार्ये परिषदेच्या जिल्हाशाखांमार्फत केली जात आहेत.

परिषदेचे 'बालशिक्षण संशोधन व विकासकेंद्र' हे या सगळया प्रत्यक्ष कार्यांना बौद्धिक आधार पुरवीत आहे. सर्वच बालशाळांतून राबविला जावा असा 'बालशाळांचा विकासाभिमुख शिक्षणक्रम' आणि बालवाडी शिक्षकप्रशिक्षणासाठी सर्वांगीण अभ्यासक्रम या केंद्राने तयार केला आहे. शिवाय 'बालशिक्षणाची ज्ञानगंगा' या नावाने, उपयुक्त वैचारिक वाङ्मयाच्या पुस्तिका प्रकाशित केल्या जात आहेत. अलीकडेच, 'नवशिक्षणाचे विश्व' या नावाने, अनेकविध नववाङ्मय इंटरनेटच्या सहाय्याने सार्वत्रिकरित्या, आणि तेही मराठीतून उपलब्ध करण्यात आलेले आहे.

परिषदेच्या संशोधन केंद्राने 'नवशिक्षणाचे विश्व' ही संकल्पना, 'महाराष्ट्र ज्ञान महामंडळा' च्या आर्थिक व तांत्रिक सहाय्याने सुरू केली. यातूनच एक मोठे संदर्भ ग्रंथालयही पुण्यामध्ये उभे राहिले आहे. केंद्रातर्फे चालविल्या जाणाऱ्या अभ्यासगटांना प्रामुख्याने या ग्रंथालयाचा खूप उपयोग होतो. 'नवशिक्षणाचे विश्व' ही संकल्पना एक पथदर्शी उपक्रम म्हणून राबविली गेली. तिने, आता, परिषदेसमोर एक भव्य स्वप्न उभे केले आहे. बालशिक्षणाचे मानवी जीवनात असलेले पायाभूत महत्त्व जाणून, बालशिक्षणाचे एक 'तरल विद्यापीठ' (Virtual University) निर्माण करण्याचा संकल्प केला आहे. महाराष्ट्र ज्ञान महामंडळाने या तरल विद्यापीठाच्या निर्मितीत पुढाकार घेतला आहे.

आज जगभरच शिक्षणाचे क्षेत्र विविध शास्त्रांमधील नवसंशोधनांनी ढवळून निघाले आहे. त्यातही मोठमोठ्या मानसशास्त्रज्ञांचे नि शिक्षणतज्ज्ञांचे लक्ष, बालवयावर आणि बालवयांतील शास्त्रशुद्ध शिक्षणावर केंद्रित झाले आहे. बालवय हे खूप महत्त्वाचे आहे, हे अतिशय संवेदनशील असे वय आहे, या वयातील शिक्षण

नीट झाले तर मुलांची प्रौढत्वाची तयारी चांगली होते, आणि ते तसे झाले नाही तर, ती तयारी अपुरी राहते. बालवय हेच खऱ्या अर्थाने मेंदू घडणीचे वय असते. मेंदू हा शिक्षणाचा अवयव असतो त्यामुळे 'मेंदूआधारित शिक्षणाची एक नवी संकल्पना, मानवी विकासाभिमुख संकल्पना म्हणून मज्जामानसशास्त्रज्ञांनी पुढे आणली आहे. तिच्या आधारे साऱ्याच शिक्षणाची नवमांडणी केली जात आहे. आणि यामध्ये मात्र बालशिक्षण आघाडीवर आहे.

या शिक्षणाच्या नवक्रांतीत, महाराष्ट्र नि मराठी माणूस मागे राहू नये, भारतानेच या नवशिक्षणाच्या मार्गावर झेप घ्यावी या हेतूंनी प्रेरित होऊन बालशिक्षणाचे तरल विद्यापीठ उभे राहत आहे. ज्याला जे हवे ते ज्ञान, हव्या त्या वेळी, हवे तेवढे, सहज हाती यावे यासाठी तंत्रज्ञान तत्पर आहे. आपण सर्वांनीच त्याच्या वापरासाठी तत्परता दाखवायला हवी आहे.

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या निमित्ताने उभे राहिलेले बालशिक्षणाचे दुसरे आंदोलन एकाच वेळी एकविसाव्या शतकात आणि नव्या तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रवेश करीत आहे. आजच्या लहान बालकांच्या भविष्यातील गरजांचा वेध घेऊन प्रगतीची नवी पावले टाकली जात आहेत.

❖